Vol 3 Issue 11 Aug 2014

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# स्वातंत्र्य आंदोलनातील अखेरच्या पर्वात धुळे जिल्ह्याचे योगदान

*अनिल माणिकराव बैसाणे*

माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

**सारांश :**

गांधीजींची प्रकृती खालावल्यामुळे त्यांची तुरुंगातून सुटका झाली होती. दुसरे महायुद्ध संपलं होतं. इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन मजूर पक्ष सत्तारुढ झाला होता आणि भारताला स्वातंत्र्य देण्याचं जाहीर करण्यात आले. त्यासाठी लॉर्ड माऊंटबॅटन यांना व्हाईसरॉय म्हणून भारतात पाठविण्यात आलं. त्यांनी भारताची राजकीय स्थिती पाहून ब्रिटिश सरकारला योजना सादर केली. ब्रिटिश पार्लमेंटने ती मंजूर केली. त्यालाच भारत स्वातंत्र्याचा कायदा म्हटले जाते. या कायद्याने 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. धुळे जिल्ह्यासह संपूर्ण खानदेशात, भारतात स्वातंत्र्योत्सव साजरा करण्यात आला. परंतु अखंड हिंदुस्थानाचं विभाजन झाले. भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे ब्रिटिश मुत्सद्यांनी निर्माण केली. असं असलं तरी पश्चिम खानदेशवासियांचं बलिदान–हौतात्म्य खानदेशवासी कधीही विसरू शकणार नाहीत.

## प्रस्तावना :

मीठाचा सत्याग्रह पावसाळ्याच्या दिवसात करणे शक्य नसल्यामुळे गांधींच्या मार्गदर्शनानुसार जंगल सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले. जेथे मीठ तयार करता येत नाही तेथे जंगल सत्याग्रह करण्याचा उपक्रम राबविण्यासाठी प्रचार सभा सुरू झाल्या. परदेशी कापडांवर बहिष्कार घालणं, त्याच्या होळी करणे, मद्यपान बंदी करणे, सार्वजनिक इमारतींवर राष्ट्रीय झेंडे लावणं इत्यादी कार्यक्रम सुरू करण्यात आला. धुळ्यातील शेकडो सत्याग्रही जंगल सत्याग्रहात सामील झाले. नवल आनंदा पाटील यांनी सर्व प्रथम जंगल कायदा मोडून सत्याग्रहाची सुरुवात केली. दोंडाईचाचे नाना शिंपी यांना तसेच नवल पाटीलांना पकडण्यात आले.

जंगल कायद्याचा भंग करण्यासाठी शहादा तालुक्यातील कोंडावळच्या जंगलात सत्याग्रहींनी प्रवेश करून कायदा मोडला. पोलीसांनी लाठीमार केला. सत्याग्रहींना पकडून तुरुंगात डांबल, याचा परिणाम होऊन साक्री, धुळे, शिंदखेडा, शहादा, नंदुरबार तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. वनचराई फी देणं बंद केलं. या चळवळीत लोहार, चौधरी, मारवाडी, ब्राह्मण, मराठे, गुजर, शिंपी अशा सर्वच समाजातील लोकांनी भाग घेतला. खानदेशातील बहुसंख्य जनता सत्याग्रहात उत्साहाने सहभागी होत होती. आता सामुदायिक जंगल सत्याग्रहाची योजना आखण्यात आली.

## अष्टाणेचा पहिला जंगल सत्याग्रह :

साक्री तालुक्यातील अष्टाणे गावाच्या माथ्यावरील जंगलात गवत कापण्याचा सत्याग्रह करण्याचे सत्याग्रहींनी ठरविले. 17 ऑगस्ट 1930 रोजी राष्ट्रीय निशाणे घेऊन व राष्ट्रीय गीते म्हणत 20 ते 25 हजारांचा जमाव घाटमाथ्याकडे रवाना झाला. जंगलातील गवत कापण्यात आलं. अनेक सत्याग्रहींना अटक झाली. कित्येकांना शिक्षा झाली. महादू वंजारी व आत्माराम कुळकर्णी यांच्याकडे सत्याग्रहाचं नेतृत्व होतं.

### *लळींगचा जंगल सत्याग्रह :*

आता जंगल सत्याग्रहासाठी धुळ्याजवळील लळींग गावालगतच्या जंगलाची निवड करण्यात आली होती. आताही 20 ते 25 हजारांचा स्त्री–पुरुषांचा समुदाय एकत्र आला होता. येथे सत्याग्रहाचं नेतृत्व धुळ्याचे बाळ जावडेकर व कापडण्याचे दौलत पाटील करीत होते. सत्याग्रहींनी पोलीसाची फळी मोडून जंगलात प्रवेश केला. गवत उपटून सत्याग्रह केला. नेतृत्व करणाऱ्यांना पकडून सत्क मजुरीची शिक्षा झाली.

### *जयनगरचा जंगल सत्याग्रह :*

पश्चिम खानदेशातील हा तिसरा जंगल सत्याग्रह होता. शहादा तालुक्यातील जयनगर येथे 31 ऑगस्ट 1930 रोजी हजारो लोक एकत्र जमले त्यात गुजर समाज मोठ्या संख्येने आला होता. त्यावेळी मंगेश बभुता व राजाराम वाघ मास्तर यांना पकडण्यात आलं व 9 महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली.

### *डांगुर्णे जंगल सत्याग्रह :*

शिंदखेडे तालुक्यातील डांगुर्णे येथील जंगलातील गवत कापण्याचा सात्याग्रह पाहण्यासाठी हजारोंचा जनसमुदााय हजर झाला होता. त्यावेळी दलवाडे, बाह्मणे, शिंदखेडे, दोंडाईचे येथील आलेल्या सत्याग्रहींना अटक करण्यात आली.

### *कुडावदचा जंगल सत्याग्रह :*

शहादा तालुक्यातील कुडावदचा जंगल सत्याग्रह सप्टेंबर 1930 मध्ये करण्यात आला. अशारितीने धुळे जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह कार्यक्रम महात्मा गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार राबविला जात होता. जंगल सत्याग्रहाचा भर ओसरू लागला होता आणि ऑक्टोबर 1930 च्या मध्यापासून धुळे जिल्ह्यातून सविनय कायदेभंगाची चळवळ हळूहळू बंद झाली होती.

### *गांधी–आयर्विन करार :*

या करारानुसार निष्कारण डांबलेल्या सत्याग्रहींची सुटका करण्यात आली. सरकारने वटहुकूम मागे घेतले होते. त्यातच लोहार कटातील क्रांतीकारक भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना मार्च 1931 मध्ये फाशी देण÷यात आली. या घटनेचे पडसाद धुळे जिल्ह्यात तीव्र उमटले. शेतकऱ्यांच्या व भिल्लांच्या परिषदा आयोजित करण्यात आल्या. शेतसारा तहकूब करणं, वनचराई माफ करणं, इत्यादी ठराव करण्यात आले होते. गांधी जयंती निमित्त सव्वा कोटी वार हातसूत अपर्ण करण्याचा संकल्प संयुक्त खानदेशने केला होता. गांधी–आयर्विन करारात ठरल्याप्रमाणे दुसऱ्या गोलमेज परिषदेला गांधीजी लंडनला गेले. पण कोणतीही मागणी मान्य न झाल्यामुळे भारतात परत आले व लगेच करबंदी, मीठ उत्पादन, जंगल सत्याग्रह इ. कायदेभंग चळवळ पुन्हा सुरू करण्याचा इशारा गांधीजींनी दिला. यावेळी सरकारने काढलेल्या वटहुकूमानुसार म. गांधी व सरदार पटेल यांना अटक झाली. त्यांच्या अटकेचं वृत्त समजताच धुळे जिल्ह्यात सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. तेव्हा सत्याग्रहींना पकडून अटकेत ठेवण्यात आले. पुन्हा अटकेचं सत्र सुरू झालं होतं.

### *जातीय निवाडा*

इंग्लंडच्या पंतप्रधानांनी याच काळात जातीय निवडा जाहीर करून दलितांसाठी विभक्त मतदारसंघ दिले. त्याला गांधीजींनी विरोध दर्शविला व त्यासाठी आमरण उपोषण सुरू केलं. यामुळे देशभर खळबळ माजली. गांधींचे उपोषण सुटावे म्हणून प्रयत्न करण्यात येऊन म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात पुणे करार झाला.

तिसऱ्या गोलमेज परिषदेवर काँग्रेसने बहिष्कार टाकला होता. कायदेभंगाची चळवळ चालूच होती. तिसऱ्या गोलमेज परिषदेत झालेल्या चर्चेनुसार ब्रिटिश सरकारनं श्वेत पत्रिका प्रसिद्ध केली. धुळे जिल्ह्याने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. पुढे एप्रिल 1934 मध्ये गांधींनी एका पत्रकान्वये कायदेमंडळाच्या प्रवेशाच्या मागणीला संमती देऊन कायदेभंग चळवळ तहकूब करण्याचा निर्णय घेतला. चळवळ समाप्त झाली. परंतु या चळवळीनं स्त्री वर्गातही चळवळीची जागृती केली. 1935 चा कायदा झाला. प्रांतांना जबाबदार राज्यपद्धती देऊन प्रत्यक्षात प्रांताच्या गव्हर्नरला आणि केंद्राच्या गव्हर्नर जनरलला अमर्याद अधिकार देण्यात आले होते. काँग्रेसने जळगाव जिल्ह्यात ग्रामीण भागातील फैजपुरला पहिलं अधिवेशन भरवलं. 1935 च्या कायद्यानुसार प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. जबाबदार राज्यपद्धतीप्रमाणे कायदेमंडळाचं कामकाज सुरू असतांनाच 1939 मध्ये दुसरं महायुद्ध सुरू झालं. या युद्धात भारतालाही ओढण्यात आलं. ब्रिटिशांनी प्रथम आपलं युद्धाचं धोरण जाहीर करावं म्हणून भारतीयांनी मागणली केली. व्हाईसरॉयने ती फेटाळून लावली.

तेव्हा कॉंग्रेसच्या युद्धविषयक धोरणाला पाठींबा व ब्रिटिशांच्या युद्धविषयक धोरणाचा निषेध करण्यासाठी धुळे जिल्ह्यात नेत्यांची भाषणे होऊ लागली. शेवटी कॉंग्रेस मंत्रीमंडळाने राजीनामे दिल आणि युद्धविरोधी व ब्रिटिशविरोधी प्रचार सुरू केला.

### *अखेरचा लढा चलेजाव चळवळ आणि धुळे जिल्ह्याचा सहभाग :*

ब्रिटिश सरकार युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणार असेल तरच युद्धासाठी सहकार्य मिळेल अशी आता कॉंग्रेसची मागणी होती. तसेच सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचाही कॉंग्रेसने ठराव केला होता. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील सत्याग्रहींना सत्याग्रहाचे शिक्षण देण्यासाठी मे 1940 मध्ये पुणे येथे सत्याग्रही शिबिर सुरू झालं. धुळे जिल्ह्यातून बाळूभाई मेहता, चुडामन पाटील, देशमुख हे तिघे नेते गेले होते. धुळे जिल्ह्यातही अशीच शिबिरे शहादे येथे सुरु झाली.

### *वैयक्तिक सत्याग्रह*

वैयक्तिक सत्याग्रह करण्याचा निर्णय खानदेशात घेण्यात आला. सत्याग्रहाची सूत्रे गांधीजींकडे होती. गांधींच्या योजनेनुसार पहिले सत्याग्रही विनोबा भावे यांनी युद्धविरोधी भाषण करून वैयक्तिक सत्याग्रह मोहिमेची सुरुवात केली. म्हणून त्यांना अटक झाली. त्याचा निषेध म्हणून धुळे जिल्ह्यात हरताळ पाळण्यात आला. दुसरे सत्याग्रही जवाहरलाल नेहरु यांनाही अटक झाली तेव्हा धुळ्याच्या कामगारांनी हरताळ पाळला डॉ. उत्तमराव पाटील यांनी शिरपूरला युद्धविरोधी भाषण केलं म्हणून त्यांनाही अटक करण्यात आली. बाळूभाई मेहता यांच नाव जिल्ह्याचे पहिले सत्याग्रही म्हणून म. गांधींनी मंजूर केलं. परंतु आजारी झाल्याने धुळे जिल्ह्यात शहादे तालुक्यातून कॉंग्रेसचे मोहनराज देशमुख यांना सत्याग्रह करण्याचा पहिला मान मिळाला. धुळ्याचे मुरलीधर भावसार यांनीही सत्याग्रह केला. सत्याग्रहींच्या अटकेचा निषेध म्हणून कामगारांनी निषेध केला. काम बंद केल. बाळूभाईनी धुळ्याला युद्धविरोधी घोषणा देऊन सत्याग्रह केला तेव्हा त्यांना अटक झाल्यावर त्यांच्या अटकेच्या निषेधार्थ धुळे शहरात हरताळ पाळण्यात आला. ओंकार संभू पाटील, देवराम पाटील, चुडामण पाटील, पार्वतीबाई ठकार, मंगेश पाटील, शंकरभाई पटेल यांनीही सत्याग्रहात भाग घेतला. गुजर, गुजराथी, ब्राह्मण, पाटील, परदेशी, चौधरी, भावसार इ. अनेक जातिपातीच्या सत्याग्रहींनी यात भाग घेतला.

डिसेंबर 1941 पासून सत्याग्रहींविरुद्ध कारवाई करण्याचं पोलिसांनी थांबविलं. सत्याग्रहींविरुद्ध कारवाई न करण्याचे आदेश देण्यात आाले. 1940 पासूनच वैयक्तिक सत्याग्रहाची सुरुवात झाली होती. म. गांधींच्या आदेशानुसार खानदेशासह सर्व भारतातून कॉंग्रेस कार्यकर्ते युद्धविरोधी सत्याग्रह करून तुरुंगात जात होते. याच काळात जर्मनीने आक्रमक पवित्रा घेतलेला होता, तर जपानने अमेरिकेच्या पर्लहार्बरवर हल्ला करून हिंदुस्थानच्या दिशेने वाटचाला सुरू केली होती. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने ब्रिटिशांविरुद्ध जपानची मदत घेतल्याने इंग्लंडचा पंतप्रधान चर्चिल चिंतेत पडला होता.

आता अमेरिका युद्धात उतरली होती. अमेरिकेने इंग्लंडला (रुझवेल्टने चर्चिलला) भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्याची घोषणा करण्याचं सुचविले होते. त्यासाठी क्रिप्स मिशन भारतात आले. पण क्रिप्स योजना भारतीयांनी फेटाळून लावली.

जुलै 1942 मध्ये वर्धा येथे अखिल भारतीय कॉंग्रेस वर्किंग कमिटीची सभा भरली. कॉंग्रेसने ब्रिटिशांना हिंदुस्थान सोडण्याचा व स्वातंत्र्यासाठी सामुदायिक लढा सुरू करू असा निर्वाणीचा इशारा दिला. गांधींच्या नेतृत्वाखाली अंतीम लढा सुरू असल्याचे वृत्त समजताच भारतीयांमध्ये उत्साह निर्माण झाला.

खानदेशात अंतिम लढ्याची तयारी सुरू झाली. 26 जुलै 1942 रोजी बाळूभाई मेहता यांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे सभा आयोजित करण्यात आली. 8 ऑगस्ट 1942 रोजी चलेजाव चा ठराव कॉंग्रेसने पास केला. देशव्यापी अहिंसात्मक लढा सुरू करण्याचे अधिकार गांधीजींना देण्यात आले. तेव्हा करेंगें या मरेंगे असा संदेश गांधीजींनी जनतेला दिला. गांधीजींनी सत्याग्रहाला सुरुवात करण्याआधी त्यांना अटक झाली आणि भारत संरक्षण कायद्यान्वये जाहीर सभा व मिरवणूकीवर बंदी घालण्यात येऊन धरपकडीचे सत्र सुरू झाले. धुळे जिल्ह्यातील माधवराव दिवाण, मुरलीधर भावसार, नवल आनंदा, शंकरराव सापे, नांदेडकर यांना पकडण्यात आल्याचं वृत्त समजताच मिल कामगारांनी हरताळ पाळला. काही कॉंग्रेस कार्यकर्ते भूमिगत झाले. युद्ध विरोधी घोषणा दिल्यामुळे शिरपूरचे गुजराथी, शंकर माळी जानकीराम शिंपी, जे. बी. पाटील आदिंना अटक झाली. नंदुरबार, साक्री, तळोदा, नवापूर या तालुक्यातील कॉंग्रेस नेते भूमिगत झाले. 15 ऑगस्ट 1942 रोजी व्यंकट धोबी कानडे, रामराव पाटील, लहू पाटील आदींनी धुळे येथे पहाटे सब जज्जच्या कोर्टात तेलाचे बोळे फेकून इमारत पेटविण्याचा प्रयत्न केला.

### *उघडबंड :*

जनतेने आता कायदा मोडून हिंसात्मक मार्ग अवलंबिला होता. विष्णू भाऊ पाटील यांच्या सेवाग्रामच्या

भेटीनंतर कॉंग्रेसच्या भूमिगत चळवळीला तारा तोडणे, रेल्वे रुळ उखडणे, पुल उडविणे या कार्यक्रमांना मान्यता देण्यात आली. त्यामुळे धुळे जिल्ह्यात भूमिगत चळवळ सुरू झाली. बोरकुंडचे ओंकार बापू पाचपूते भूमिगत राहून काम करीत होते. कापडणे, बोरकुंड, दळवाडे, चिरणे, कमखेड, सवाई–मुकटी, डांगुर्णे, नावरा–नावरी, देऊर, विटाई ह्या गावांच्या जंगलांमधून गुप्त बैठका होत होत्या. भारत छोडो कार्यक्रम सांगून चळवळीसाठी प्रवृत्त केले जात होते. साने गुरुजींच्या सहीची प्रक्षोभक अशी छापील पत्रके खानदेशात वाटली जात होती. सरकारी कचेऱ्यांवर झेंडे लावण्याचे प्रयत्न सुरू झाले. नंदुरबार तालुक्यातील रनाळा येथील इन्स्पेक्शन बंगल्याला आग लावल्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. शाळकरी मुलेही सामील होऊ लागली होती. नंदुरबारला मिरवणूकीवर पोलिसांनी लाठीमार व गोळीबार सुरू केला. त्यात शिरीष मेहतासह 4 मुले जागीच ठार झाली. या घटनेमुळे नंदुरबार शहरातील शाळा, दुकाने बंद होती. पोलिसांनी दडपशाहीचा मार्ग अवलंबिला होता. म्हणून पोलिस पाटलांनी पाटीलकी पदाचे राजीनामे द्यायला सुरुवात केली होती. प्रशासकीय यंत्रणा ठप्प झाली होती. चिमठाण्याच्या इन्स्पेक्शन बंगल्याला आग लावण्यात आली. धुळ्याचे चुडामण पाटील, शालीग्राम भारतीय, कापड्याचे विष्णुभाऊ पाटील, शिंदखेड्याचे बाबुराव गुरव, भिका वाणी, दलवाड्याचे देवगण पाटील, चिलाण्याचे हिलाल पाटील, भाऊराव पाटील आदींनी भूमिगत चळवळ चालविली होती. धुळ्याच्या पोस्ट ऑफीसात, गरुड वाचनालयात, कोर्टात बॉम्ब फेकण्यात आले, धुळे येथील भिडे बाग हे गुप्त हालचालींचे एक केंद्र बनले होते. नंदुरबारचे बारकू पाटील, दत्तू काका उपासनी, धुळ्याचे लक्ष्मण शेळकर आदींनी बॉम्बस्फोट घडवून आणले. दोंडाईचे हे भूमिगत कार्यकर्त्यांचं केंद्र बनलं. दोंडाईचाची कांता भावसार ही लहान मुलगी भूमिगतांना साहित्य पोहचविण्याचं काम करीत होती. शिरपूरचे शिवाजी पाटील, डॉ. उत्तमराव पाटील, लिलाताई पाटील भूमिगत राहून स्वातंत्र्य चळवळ करीत होते.

चलेजाव चळवळीला दडपशाही मार्गाने दडपून टाकण्याचा ब्रिटिश सरकार प्रयत्न करीत होते. परंतु खानदेशात मात्र चळवळ प्रगती पथावर होती. धुळे जिल्ह्यात चिमठाण्याजवळ सारवे गावाजवळ साडे पाच लाखाचा खजिना लुटण्याची मोठी क्रांतीकारक घटना घडली. व्यंकट धोबी, जी. डी. लाड, नागनाथ नायकवाडी, धोंडीराम माळी, किसन मानस्तर, रामचंद्र पाटील, उत्तमराव पाटील, शंकर माळी, रावसाहेब कळके हे या सरकारी खजिना लुटीच्या प्रकारात सामील होते. हा खजिना नासिक येथून सातऱ्याला नेणाऱ्या राजुमती पाटलांचाही उल्लेख प्रामुख्यानं करावा लागेल. त्याकाळातील भारत साप्ताहिकात या घटनेची माहिती वाचावयास मिळते. खजिना लूट प्रकरणात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सामील असलेल्या शिवाजी पाटील, उत्तमराव पाटील, शंकर माळी, फकिरा देवरे, दत्तु चौधरी, धोंडीराम माळी, किसन मास्तर यांना अटक झाली. काहींना जन्मठेपेची तर काहींना सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. हा लुटीचा पैसा चळवळीच्या उद्दिष्टांसाठीच वापरण्यात आला. जाळपोळ, लुटालूट, घातपातीचे प्रकार वगैरे घटनांमुळे धुळे जिल्ह्यातील काही गावांवर सामुदायिक दंड लावण्यात आला.

***संदर्भ :***


1.बापट गो. म. (संपा.), धुळे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरवग्रंथ, धुळे 1988.
2.धुळे जिल्हा गॅझिटीयअर
3.स्वतंत्रता दिन विशेषांक.
4.प्रा. डॉ. भी. ना. पाटील, खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ.
5.जळगाव जिल्हा : महाराष्ट्र राज्य गॅझीटीयर.





***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org